RNI No. MAHBIL /2009/40124

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक १२(१२)] शुक्रवार, जुलै ४, २०२५/आषाढ १३, शके १९४७ [पृष्ठे ६ किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ५५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **४ जुलै २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा **नियम ११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. XLIII OF 2025.**

A BILL

TO PROVIDE INCENTIVES TO PERSONS WHO GET STERILIZED UNDER THE FAMILY WELFARE PROGRAMME.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४३.**

**कुटुंब कल्याण कार्यक्रमाखाली ज्यांनी संततिनियमनाच्या शस्त्रक्रीया करून घेतल्या आहेत अशा व्यक्तींना प्रोत्साहन देण्यासाठी तरतूद करण्याकरिता विधेयक.**

**ज्याअर्थी,** लोकसंख्येची वाढ नियंत्रित करण्यासाठी शासनाने उत्तम प्रकारे प्रयत्न केले असूनसुद्धा राज्याची लोकसंख्या वाढतच आहे, आणि त्यामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेवर फारच ताण पडत आहे ; **आणि ज्याअर्थी,** लोकसंख्येच्या वाढीचे प्रमाण नियंत्रित करण्यासाठी काही नवीन आणि अधिक परिणामकारक उपाययोजना शोधून काढणे व स्वीकारणे इष्ट आहे ;

**आणि ज्याअर्थी,** ज्या व्यक्तींना दोनपेक्षा अधिक हयात मुले नसतील अशा व्यक्तींना त्यांच्या मुलांच्या संख्येत वाढ होऊ नये म्हणून कोणत्या ना कोणत्या प्रकारे प्रोत्साहन देऊन कुटुंब कल्याण कार्यक्रमाला जोमाने चालना मिळण्यासाठी तरतूद करणेही इष्ट आहे. त्याअर्थी, याद्वारे भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास महाराष्ट्र प्रोत्साहनाद्वारे कुटुंब नियोजनास चालना देण्याबाबत अधिनियम, २०२५ असे म्हणता येईल.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू राहील.

(३) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे जी तारीख नेमील अशा तारखेस अंमलात येईल.

या अधिनियमाची अंमलबजावणी करण्यासाठी यंत्रणा.

**२.** कुटुंब कल्याण कार्यक्रमाची अंमलबजावणी व कार्य करणाऱ्या शासनाच्या विद्यमान यंत्रणेद्वारे सध्या या अधिनियमाच्या तरतुदी पार पाडण्यात येतील.

प्रत्येक प्रौढ व्यक्तीस या या अधिनियमान्वये लाभ मिळण्याचा हक्क असेल.

**३.** या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन राहून आणि याबाबतीत अंमलात असलेल्या विद्यमान अधिनियमाच्या तरतुदींना हानी न पोचवता, ज्या प्रौढ व्यक्तीने स्वतःवर संतती नियमनाची शस्त्रक्रिया स्वेच्छेने करून घेतली असेल आणि या अधिनियमान्वये प्रोत्साहनाची मागणी करतेवेळी तिची दोनपेक्षा अधिक हयात मुले नसतील अशा राज्यातील प्रत्येक प्रौढ व्यक्तीला, राज्य शासनाकडून प्रोत्साहनाच्या स्वरूपात या अधिनियमाने लाभ मिळण्याचा हक्क असेल.

संततिनियमनाची शस्त्रक्रिया करून घेणाऱ्या व्यक्तींना मिळणारे लाभ.

**४.** जी व्यक्ती, कुटुंब कल्याण योजनेचे पालन करण्याची लेखी स्वरूपात हमी घेईल आणि दोनपेक्षा जास्त मुले नसावीत या गोष्टीला तिची संमती असेल आणि या प्रकारे संततिनियमनाची शस्त्रक्रिया करण्यास स्वेच्छेने तयार असेल अशा प्रत्येक व्यक्तीला यापुढे तरतूद करण्यात आल्याप्रमाणे सवलती आणि लाभ मिळण्याचा हक्क असेल :—

(अ) शासकीय सेवेत प्रवेश मिळण्यासाठी तीन वर्षांनी वयोमर्यादा शिथिल करणे, लाभाची ही सवलत पती आणि पत्नी या दोघांनाही उपलब्ध होईल;

(ब) जेव्हा अशी व्यक्ती, सरकारी किंवा निम-सरकारी संस्थेत नोकरीला असेल तेव्हा त्याला किंवा तिला कुटुंब कल्याण कार्यक्रमासाठी प्रोत्साहन म्हणून एकावेळी दोन या मर्यादेत आगाऊ वेतनवाढी देण्यात येतील, जर पती आणि पत्नी हे दोघेही सरकारी किंवा निमसरकारी नोकरीत असतील तर त्या दोघांनाही हा लाभ मिळण्याचा हक्क असेल;

(क) अशा व्यक्तीना रासायनिक खते, शिधावाटप दुकाने, रॉकेल, भांडी वगैरेच्या एजन्सीचे वितरण किंवा वाटप करताना शासनाकडून अग्रक्रम देण्यात येईल;

(ड) रास्त भावाची दुकाने, रॉकेल, मॅफको एजन्सी, सिमेंट वितरण वगैरे सारख्या शासनाच्या इतर एजन्सीच्या वितरणासाठी, अशा व्यक्तींच्या मुलाने/मुलीने अर्ज केला असेल तर शासनाकडून अशा अर्जदारांच्या बाबतीत विशेष लक्ष देण्यात येईल आणि त्यांना अग्रक्रम देण्यात येईल;

(ई) जेव्हा अशा व्यक्तीच्या मुलांस/मुलीस अभ्यासक्रम पुढे चालू ठेवावयाचा असेल आणि कर्जाच्या स्वरूपात त्यांना आर्थिक सहाय्याची गरज असेल तेव्हा शासन त्याला असे कर्ज देण्याची सोय करील. ही कर्ज सुलभ हप्त्यांनी चुकती करता येतील आणि त्यावर कोणतेही व्याज आकारण्यात येणार नाही. शासन, प्रत्येक प्रकरणात असे सहाय्य देण्याची मर्यादा निश्चित करील :

परंतु, जेव्हा अशा व्यक्ती, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या गटातील असेल तेव्हा शासन त्या व्यक्तीच्या मुलांसाठी पदवी शिक्षणाच्या स्तरापर्यंत मोफत शिक्षण आणि इतर शैक्षणिक सोयी पुरवील.

पुनर्जनन क्षमता पुन्हा प्राप्त करून घेतल्यास सवलती आणि सुविधा रद्द करणे.

**५.** या अधिनियमान्वये सवलतीसाठी पात्र असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने वैद्यकीय किंवा आरोग्यविषयक कारणांव्यतिरिक्त अन्य कारणास्तव स्वतःची पुनर्जनन क्षमता पुन्हा प्राप्त करून घेतली असेल तर तिला किंवा तिच्या मुलांना या अधिनियमान्वये देण्यात आलेल्या प्रोत्साहनांच्या मार्गांने मिळणाऱ्या सर्व सवलती रद्द करण्यात येतील.

**६.** या अधिनियमान्वये प्रोत्साहनांसाठी पात्र असणाऱ्या व्यक्तींने तिला त्या सवलती मिळत असताना कोणत्याही वेळी, अशा सवलतींशी संलग्न असलेल्या कोणत्याही अटींचा भंग केल्यास त्यावेळी या अधिनियमान्वये तिला किंवा तिच्या मुलांना देण्यात येणाऱ्या सर्व सुविधा आणि सवलती तात्काळ रद्द करण्यात येतील. अशा प्रोत्साहनांशी संलग्न असलेल्या अटींचा भंग केल्यास सवलती रद्द होणे.

**७.** (१) राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** एवं प्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील. नियम करण्याचा अधिकार.

(२) ह्या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो तयार करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील तर असा निर्णय **शासकीय राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरूपात अंमलात येईल किंवा यथास्थिती, मुळीच अंमलात येणार नाही; तथापि, असा कोणताही फेरबदल किवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधीग्राह्यतेस बाधा येणार नाही.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी सर्वंकष प्रयत्न चालू असतानादेखील महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या वेगाने वाढतेच आहे. महाराष्ट्र राज्य हे देशामधील कुटुंब कल्याण कार्यक्रमांच्या बाबतीतील अग्रेसर राज्य आहे. तथापि, अनुभव असा आहे की, बहुसंख्य लोक स्वेच्छेने या कुटुंब नियोजन कार्यक्रमांना प्रतिसाद देत नाहीत. या कार्यक्रमांना चालना देण्यासाठी आणि लोकांचे लक्ष या कार्यक्रमांकडे वेधून घेण्यासाठी लोकांना विशेषतः शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना शिक्षणविषयक सुविधा, वित्तीय सहाय्य आणि इतर सुविधा यांच्या स्वरूपात विशेष प्रोत्साहने देण्यासाठी तरतूद करणे आवश्यक झाले आहे.

या विधेयकातील तरतुदींमुळे जनतेमधील असंख्य लोकांची स्थिती सुधारेल तसेच, ग्रामीण व शहरी क्षेत्रांमधील ज्या लोकांना डोळ्यासमोर ठेवून हे कार्यक्रम आखण्यात आलेले आहेत त्या दोन्ही क्षेत्रांमधील लोक सारख्याच प्रमाणात जास्तीत-जास्त संख्येने, स्वेच्छेने संतती नियमनाची शस्त्रक्रिया करून घेण्यासाठी पुढे येतील आणि अशाप्रकारे कुटुंब कल्याण कार्यक्रमांचे काम करणाऱ्या संस्था आणि त्यांच्याशी संबंधित व्यक्ती यांना हे एक वरदानच ठरेल.

वरील उद्दीष्ट्ये साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २६ मे २०२५.

**सुधीर मुनगंटीवार,**
प्रभारी सदस्य.

## वित्तीय ज्ञापन

**खंड ४**.— अन्वये कुटुंब कल्याण योजनेच्या पात्र लाभार्थ्यांच्या पाल्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यासाठी राज्याच्या एकत्रित निधी मधून कराव्या लागणाऱ्या प्रत्यक्ष आवर्ती खर्चाचा अंदाज या टप्प्यावर देता येणे शक्य नाही.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन.

या विधेयकात वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत—

**खंड १.** (३).— या खंडाद्वारे, राज्य शासनास, राज्य **शासन राजपत्रातील** अधिसूचनेद्वार नियुक्त करील अशा दिनांकास हा अधिनियम अंमलात आणण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

**खंड ७.**— या खंडाद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता नियम करण्याचे अधिकारे राज्य शासनाला प्रदान करण्यात आले आहेत.

वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे वरील प्रस्ताव सामान्य स्वरूपाचे आहेत.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ४ जुलै, २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१),
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.